# साय-फाय करंडक 'आमचे आम्ही'ला!

**मुंबई (प्रतिनिधी) :** क्विक हील फाऊंडेशनतर्फे आणि महाराष्ट्र सायबर सेल व थिएटर ॲकॅडमी यांच्या सहयोगाने आयोजित साय-फाय करंडक 'आमचे आम्ही' या पुण्यातील नाट्य संस्थेने जिंकला. 'आय ॲंग्री' या एकांकिकेच्या सादरीकरणातून कलाकारांनी करंडक पटकावला. नाट्यसंस्कार, पुणे या संस्थेला 'एफ ५७' या एकांकिकेसाठी दुसरा, तर मुंबईच्या स्वप्नपूर्ती क्रिएशन्सला 'कम्युनिकेशन एरर' या एकांकिकेसाठी तिसरा क्रमांक मिळाला.

क्विक हील टेक्नॉलॉजीजच्या क्विक हील फाउंडेशनतर्फे ही स्पर्धा थिएटर ॲकॅडमीने नव्याने विकसित केलेल्या पुण्यातील सकळ ललित कलाघर येथे रंगली. अंतिम फेरीमध्ये नऊ संघांतून 'आमचे आम्ही' संस्थेने पहिला क्रमांक मिळवला. प्रसिद्ध अभिनेता रितेश देशमुख आणि जॅकी श्रॉफ यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. या दोन कलाकारांची उपस्थिती कार्यक्रमाचे आकर्षण होते. महाराष्ट्र सायबर सेलचे सचिन पांडकर, थिएटर ॲकॅडमीचे अध्यक्ष प्रसाद पुरंदरे, दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले, अभिनेता जितेंद्र जोशी, फाउंडेशनचे मुख्य कैलाश काटकर व संजय काटकर उपस्थित होते. ज्येष्ठ रंगकर्मी विजय केंकरे आणि अभिनेता आनंद इंगळे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.




सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजिलेल्या या अनोख्या एकांकिका स्पर्धेस उदंड प्रतिसाद मिळाला. महाराष्ट्रातून शंभरपेक्षा जास्त प्रवेशिका आल्या होत्या. प्रसाद पुरंदरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे, मुंबई, औरंगाबाद, कोल्हापूर, गोवा आणि नागपूर या प्रादेशिक केंद्रांमध्ये चाचणी घेऊन अंतिम फेरीसाठी नऊ संघ निवडण्यात आले होते. साय-फाय करंडकाच्या अंतिम फेरीत विचारप्रवर्तक आणि आजच्या काळाच्या एकांकिका सादर झाल्या. आजच्या डिजिटल प्रेरित जीवनशैलीवर त्यातून प्रकाश टाकण्यात आला.